**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ५५/२०२६ निशाणी क्र.१ खालील आदेश**
**सखाराम वि शासन**
**[CNR NO.MHBI0900-0304-2026]**

१. अर्जदार सखाराम मारोती धुमाळ याने प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ अन्वये प्रस्तुत गुन्हयामध्ये जप्त करण्यात आलेला मुद्देमाल म्हणजे अर्जदाराचा हिरव्या रंगाचे जॉनडियर कंपनीचे ट्रॅक्टर ज्याचा पासींग क्र.MH-23-AS-1147, असुन चेसीस क्र. 1PY5210ETGA000042 व इंजिन क्र.PY3029T251453 हे वाहन परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जाच्या पुष्टयार्थ अर्जदाराने त्याचे शपथपत्र देखील दाखल केले आहे.

२. अर्जदाराचे कथन आहे की, त्याचे वर नमुद वाहन हे दिंद्रुड पोलीसांनी अपराध क्र– ०७/२०२६ मध्ये जप्त केलेले आहे. सदर वाहनाचा अर्जदार हा मालक आहे. अर्जदाराने सदर वाहन त्यास परत मिळावे म्हणुन विनंती केलेली आहे.

३. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व तपास अधिकरी यांनी यांनी अर्जास हरकत घेतली आहे. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी दिलेल्या लेखी म्हणण्यामध्ये कथन केले की, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अपघाताच्या दिवशी वाहनाचा विमा नसेल तर सॉलव्हंट श्युरिटी शिवाय वाहन अर्जदारास देता येणार नाही. त्यांनी कथन केले की, अर्जदार यांच्याकडून मयत व्यक्तीला नुकसान भरपाई मिळेपर्यंत वाहन विक्री करू नये तसेच नुकसान भरपाई साठी सॉलव्हंट श्युरिटी देण्याचा आदेश करावा.

४. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. सरकारी वकील यांनी सदर वाहन अपघ ातामध्ये जप्त केल्याचे व अपघात झाला त्यावेळी वाहनाचा विमा नसल्याने अर्जदाराकडून अपघातातील जखमी यांना मोटरवाहन कायद्यांतर्गत नुकसान भरपाई मिळण्याच्या रकमेची हमी अर्जदाराकडून घेतल्याशिवाय वाहन सोडता येणार नाही असा युक्तीवाद केला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार यांनी नि.क्र.४ सोबत अर्जदाराने त्याचे स्वत:चे आधारकार्ड प्रत, एफ.आय.आर.प्रत व इन्श्युरन्स च्या प्रती दाखल केलेल्या आहेत. तसेच आर.सी.बुक ची पडताळणी प्रत दाखल केली आहे.

६. सदर कामी अर्जदाराने दाखल केलेल्या वाहनाच्या वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आर सी बुक ) प्रतीचे व विना प्रतीचे अवलोकन केले असता वाहन मालक

म्हणुन अर्जदारच्या नावाची नोंद असल्याचे दिसुन येत आहे. सदर प्रकरणाचा निकाल लागण्यास काही कालावधी जाणार आहे. सदर प्रकरणामध्ये असे दिसून येते की, गुन्हा घडल्याच्या अनुषंगाने जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा अर्जदार यांचा आहे. मुद्देमालाचा ताबा अधिकार हा सकृतदर्शनी सदर अर्जदार यांचा आहे असे दिसुन येते. सदर प्रकरणातील मुद्देमालाचा विचार करता सदर मुद्देमाल हे एक प्रकारचे वाहन आहे. त्याच्यावर हवामानाचा परिणाम होणार आहे. सदर वाहन पोलीस स्टेशनमध्ये पडुन राहील्यास त्याचा काहीही उपयोग होणार नाही. सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत सदर जप्त मुददेमाल अर्जदार याच्या ताब्यात देणे योग्य होईल. परंतु, सदर वाहन हे अपघातामध्ये जप्त झाले आहे. अपघात घडला त्यावेळी वाहनाचा विमा नसल्याचे अर्जदाराला देखील मान्य आहे. **जयप्रकाश वि. नॅशनल इन्श्युरन्स कंपनी, (२०१०) २एस.सी.सी ६०७ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने** परिच्छेद क्र.४१ मध्ये अपघ ातग्रस्त वाहनाचा विमा नसल्यास सदर वाहन सोडतांना वाहन मालक यांच्याकडून अपघातग्रस्तांना द्यावयाच्या नुकसान भरपाईच्या रकमेबाबत हमी घ्यावी अथवा त्याबाबत त्याच्याकडून रक्कम जमा करून घ्यावी असे सांगितले आहे. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने असे देखील सांगितले आहे की, वाहन मालकाने तीन महिन्याच्या आत तशी हमी दिली नाही अथवा रक्कम जमा केली नाही तर सदर वाहन विक्री करून मिळणारी रक्कम नुकसान भरपाई देण्याकरिता जमा करून ठेवावी. त्याचप्रमाणे वाहन सार्वजनिक रस्त्यावर चालवितांना त्याचा विमा उतरविणे हे वाहन मालकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे, विमा नसतांना अपघात झाल्यास त्याची जबाबदारी देखील वाहन मालकाची असते. त्यामुळे, सदर प्रकरणात वाहनाचा विमा नसल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्देशित केल्याप्रमाणे वाहन सोडतांना वाहन मालकाकडून अपघात ग्रस्तांना नुकसान भरपाई मिळणेबाबत योग्य ती हमी घेणे आवश्यक आहे.

७. प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले असता अर्जदाराच्या वाहनाने फिर्यादीच्या मोटारसायकलला धडक दिल्याने फिर्यादीचा पुतण्या संदीप अप्पा जाधव हा गंभीर जखमी होवून मयत झालेला आहे. अशा परिस्थीतीमध्ये मयताच्या कुटुंबियांना मिळणा—या नुकसान भरपाई बाबत सुरक्षा (Security) म्हणून रक्कम रू. ५,००,०००/— ची आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या जामीनदाराची हमी (Solvent Surety) व तेवढ्या रकमेचे बंधपत्र देण्याच्या अटीवर व इतर अटीवर वाहन सोडणे

संयुक्तिक राहील. वरील कारणांचा विचार करून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>: आदेश :</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल म्हणजेच अर्जदाराचा हिरव्या रंगाचे जॉनडियर कंपनीचे ट्रॅक्टर ज्याचा पासींग क्रं.MH-23-AS-1147, असुन चेसीस क्र. 1PY5210ETGA000042 व इंजिन क्र.PY3029T251453 ही सदर प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यत अर्जदार यांना खालील अटी व शर्तीवर परत करण्यात येतो—

३. अ) अर्जदाराने अपघातातील मयताच्या कुटुंबियांना मिळणा—या नुकसान भरपाईच्या रकमेच्या सुरक्षेसाठी ५,००,०००/— ची आर्थिक दृष्ट्या सक्षम असलेल्या जामीनदाराची हमी (Solvent Surety) व तेवढ्या रकमेचे बंधपत्र न्यायालयात द्यावे.

ब) अर्जदार याने न्यायालयाने आदेश दिल्यास जप्त मुद्देमाल न्यायालयात हजर करणे बाबत रक्कम रु.**४,००,०००/— (अक्षरी चार लाख रू. मात्र)** चे बंधपत्र दयावे.

क) अर्जदार याने जप्त वाहनात कोणत्याही प्रकारे बदल करू नये अथवा विल्हेवाट लावु नये, तसेच कोणासही कोणत्याही प्रकारे तबदील करु नये.

ड) अर्जदार याने सदर वाहन तपासी अधिकारी व न्यायालयाने मागणी केली असता सादर करावे.

इ) तपासी अंमलदार यांनी जप्त वाहनाचे छायाचित्रे काढुन अर्जदारासमोर पंचनामा करून सदर कागदपत्रे दोषरोप पत्रासोबत न्यायालयात दाखल करावीत.

फ) अर्जदार याने सदर वाहन यापुढे विमा काढल्याशिवाय वापरू नये.

Digitally signed by GANESH SURESHAPPA KHUPSE
Date: 2026.03.12 16:41:37 +0530

माजलगाव
दिनांक : १२/०३/२०२६.

**( जी.एस.खुपसे )**
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,(कोर्ट क्र.२)
माजलगाव.

**CERTIFICATE**

“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order”.

Dictated, transcribed, checked & signed on : 12-03-2026

Sd/-

Date: 12-03-2026

(R.M.Shaikh)
Gr-III Stenographer
2nd Jt. Civil Court J.D.Majalgaon